## :: **आ दे श** ::

१. अर्ज वाचला, नि. १७ वरील प्रतिवादी क्र. १ चा जबाब वाचला. वादीं तर्फे ॲड. ए. के. शिंदे व प्रतिवादी क्र १ तर्फे ॲड. यु. एन. शिंदे यांचा युक्तीवाद ऐकला.

२. मौजे खडकी तालुका वाई येथील शेत जमीन गट क्र १५८, २/१०, मौजे पाचवड ता. वाई येथील शेत जमीन गट क्र. ५९१/२ व चांदवडी पुर्नवसित येथील ग्रामपंचायत मालमत्ता मिळकत क्र. १३ अ यातील मिळकती बाबत वादींनी वाटपासाठी, जाहीर ठराव पारित करुन मिळणे करिता व निरंतर ताकीदी करिता हा दावा दाखल केलेला आहे. दाव्याचा अंतिम निकाल लागे पर्यंत प्रतिवादी क्र १ ने सदरचे मिळकती वरील वादींचे ताबे वहिवाटीस अडथळा निर्माण करु नये म्हणून त्याचे विरुध्द तात्पुरता मनाई हुकूम आदेश पारीत करण्यात यावा, याकरीता वादींनी दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश ३९, नियम १ प्रमाणे हा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादी क्र १ ने नि. १७ वर त्याचा जबाब दाखल करुन हा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज व प्रतिवादी क्र १ चे जबाबावरुन, हा अर्ज निकाली काढणे कामी मी खालील मुद्दे निश्चित केले आहेत व त्यावर माझा निष्कर्ष देवुन अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. वादींचे हक्कात प्रथम दर्शनी केस आहे काय ? | ... नाही. |
| २. अनुकुलतेचा समतोल वादींचे हक्कात आहे काय ? | ... नाही. |
| ३. अर्ज नामंजुर केला तर वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | ... नाही. |
| ४. काय आदेश ? | ... अर्ज नामंजुर करण्यात येत आहे. |

## :: **का र ण मि मां सा** ::

**मुद्दा क्र. १ ते ३ करीता** :

५. मनाई हुकूम आदेश पारीत करणे करीता वादींनी प्रथम दर्शनी केस त्यांचे हक्कात आहे काय, अनुकुलतेचा समतोल त्यांचे हक्कात आहे काय तसेच अर्ज नामंजुर केला तर त्यांचे अपरिमित नुकसान होईल हे तीन घटक सिध्द करणे गरजेचे आहे. या शिवाय वादी स्वच्छ हेतुने न्यायालया समोर आलेला असणे गरजेचे आहे.

६. दोन्हीं बाजूचा युक्तीवाद ऐकले नंतर वाद पत्र, लेखी कैफियत व दोन्ही बाजूकडून दाखल कागदपत्रांचे मी अवलोकन केले

आहे. वादी क्र. १ ते ३ यांचे प्रतिवादी क्र २ व ३ अनुक्रमे वडील व आई आहेत. प्रतिवादी क्र १ मारुती हा वादी व प्रतिवादी क्र २ व ३ यांचे कुटूंबातील सदस्य नाही. वादीचे कथनानुसार वाद मिळकती हया वादी व प्रतिवादी क्र २ व ३ यांचे कुटूंबाचा वडीलार्जित मिळकती आहेत. वादीचे कथनानुसार सदरचे मिळकती मध्ये वादी व प्रतिवादी क्र २ व ३ यांना समान हिस्सा आहे.

७. प्रतिवादी क्र. १ मारुती हा ति—हाईत इसम आहे. वाद मिळकतीशी त्याचा कसलाही संबंध नाही. प्रतिवादी क्र. २ राजाराम यास दारु पिणेचे व्यसन आहे. दारुचे व्यसनापोटी प्रतिवादी क्र २ राजाराम हा गावोगी फिरत असतो. वाद मिळकत ति—हाईत इसमांस हस्तांतरण करणेचा प्रतिवादी क्र २ राजाराम यास कसलाही हक्क व अधिकार नसताना दि. १९/३/१९८२ रोजी प्रतिवादी क्र १ मारुती व प्रतिवादी क्र. २ राजाराम यांचेमध्ये मौजे पाचवड येथील वाद मिळकत गट क्र. ५९१/२ बाबत साठेखत व कब्जेपावती झालेचे वादींना समजले होते असे वादींचे कथन आहे. वादींचे कथनानुसार सदरचे साठेखताचे अनुषंगाने प्रतिवादी क्र. १ मारुती यांने प्रतिवादी क्र. २ राजाराम विरुध्द दिवाणी दावा क्र. २५३/१९८९, २०६/१९९० व ५७/१९९८ हे दाखल केले होते. दि. २७/११/१९९९ रोजीचे बेकायदेशीर तडजोड हुकूमनामा प्रमाणे प्रतिवादी क्र. १ मारुती व प्रतिवादी क्र. २ राजाराम यांचेमध्ये सदरिल तिन दाव्यांबाबत तडजोड झाली होती व त्या अनुषंगाने प्रतिवादी क्र. १ मारुतीने दिवाणी दरखास्त क्र. ४०/२००९ दाखल केलेली आहे.

८. प्रतिवादी क्र. १ मारुती व प्रतिवादी क्र. २ राजाराम यांचेमध्ये सन १९८२ साली झालेले कथित साठेखत वादीवर बंधनकारक नाही, वाद मिळकतीमध्ये वादींचा समान हिस्सा आहे असे वादींचे कथन आहे. पाचवड येथील गट नं ५९१/२ हा शासनाने प्रतिवादी क्र १ मारुतीकडून संपादित करुन वादी व प्रतिवादी क्र.२ व ३ यांना सदरची मिळकत बहाल केली होती. प्रतिवादी क्र. २ राजाराम हा वादींचे कुटूंबाचा कर्ता पुरुष असलेमुळे महसुल अभिलेखास त्याचे नावाची नोंद झाली होती. प्रतिवादी क्र. २ याचे नावाचे नोंदीचा व त्याचे दारुचे व्यसनाचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र. १ मारुती याने सन १९८२ सालचे कथित साठेखत करुन घेतले होते. अशा परिस्थीतीत त्या साठे खताअधारे व दि. २७/११/१९९१ रोजीचे तडजोड हुकूमनामा अधारे प्रतिवादी क्र. १ हा वाद मिळकतीवरील वादीचे ताबे वहिवाटीस अडथळा निर्माण करत आहे त्यामुळे त्याचे विरुध्द तात्पुरता मनाई हुकूम आदेश पारीत करणेत यावा अशी विनंती वादीनी केली आहे.

९. प्रतिवादी क्र १ मारुती याचे कथनानुसार दि. १९/३/१९८२ रोजीचे साठे खतानुसार पाचवड येथील शेत मिळकत गट नं ५९१/२ खरेदी करणेबाबत त्याने प्रतिवादी क्र. २ राजाराम सोबत करार केला होता व त्याच वेळी त्याला सदरचे मिळकतीचा ताबा मिळाला होता. सदरचे साठे खतावरुन प्रतिवादी क्र. २ राजाराम याने खरेदी खत नोंदवून दयावे म्हणून त्याचे विरुध्द दिवाणी दावा क्र. २५३/१९८९, २०६/१९९०, व ५७/१९९८ दाखल केले होते व दि. २७/११/१९९९ रोजी सदरचे दाव्यात राजाराम सोबत

त्याची तडजोड झाली होती असे प्रतिवादी क्र.१ मारुतीचे कथन आहे.

१०. प्रतिवादी क्र. १ मारुतीचे कथनानुसार कायदेशीर गरजेपोटी तसेच चांदवडी येथून पाचवड येथे येवून जावून शेती करणे शक्य नसलेमुळे प्रतिवादी क्र. २ राजाराम याने त्याचे सोबत सन १९८२ सालचे साठेखत गट नं ५९१/२ बाबत केले होते. पाचवड येथील गट नं ५९१/२ ही मिळकत वगळून इतर मिळकतीबाबत प्रतिवादी क्र. १ मारुती याचा कसलाही संबंध नाही असे त्याचे कथन आहे. दि. १९/३/१९८२ सालचे साठेखत व दि. २७/११/१९९९ रोजीचे तडजोड हुकूमनामा प्रमाणे वाद मिळकत गट नं ५९१/२ वर प्रतिवादी क्र. १ मारुती याचा वैध ताबा आहे त्यामुळे हा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती त्याने केली आहे.

११. दि. १९/३/१९८२ रोजी पाचवड येथील मिळकत गट नं. ५९१/२ बाबत मारुती व राजाराम यांचे मध्ये साठे खत झाले होते तसेच त्यांचेत दाखल असलेल्या वर नमुद दिवाणी दाव्यात दि. २७/११/१९९९ रोजी तडजोड हुकूमनामा झाला होता ही बाब वादींना मान्य आहे. परंतू वादींचे कथनानुसार सदरच्या दोन्ही बाबी बेकायदेशीर आहेत. वादीचा हिस्सा डावलून सदरचे कथित साठेखत करणेत आले आहे असे वादींचे कथन आहे.

१२. नि. ३ सोबत तसेच नि. २६ सोबत दाखल कागद पत्रांचे अवलोकन केले असता दि. १९/३/१९८२ रोजी मारुती व राजाराम यांचे मध्ये पाचवड येथील शेत मिळकत गट नं ५९१/२ या

मिळकती बाबत साठेखत झाले होते व त्यातून निर्माण झालेल्या दिवाणी दाव्यानुसार दिवाणी दावा क्र. २५३/१९८९ मध्ये दि. २७/११/१९९९ रोजी त्यांचे मध्ये तडजोड हुकूमनामा झाला होता असे दिसून येत आहे. दि. २७/११/१९९९ रोजीचा तडजोड हूकूमनामा हा सक्षम दिवाणी न्यायालयाने पारीत केलेला असलेमुळे व त्याबाबत मा.वरिष्ठ न्यायालयाचा स्थगिती आदेश नसलेमुळे सदरचा हुकूमनामा नाकारणेचे या न्यायालयास काहीही कारण नाही. सबब सदरचे दोन्ही बाबीवरुन वाद मिळकत गट नं ५९१/२ या मिळकतीवर प्रतिवादी क्र. १ मारुती याचा या क्षणी ताबा असलेचे दिसून येत आहे.

१३. प्रतिवादी क्र. १ मारुती याचा ताबा वैध आहे की, अवैध आहे हा पुराव्याचा भाग आहे, या क्षणी त्याबाबत कसलाही निष्कर्ष काढणे उचीत होणार नाही. तसेच वादींना सदरचे मिळकती मध्ये हिस्सा आहे का नाही याबाबत ही या क्षणी भाष्य करणे उचीत होणार नाही. सबब शेत मिळकत गट नं ५९१/२ यावर वादींचा ताबा या क्षणी दिसून येत नसलेमुळे तसेच ही मिळकत वगळून इतर वाद मिळकतीवर वादींचा ताबा आहे परंतू त्याबाबत प्रतिवादी मारुतीचा कसलाही संबंध नसलेमुळे वादींचे हक्कात हा अर्ज मंजुर करता येणार नाही. अर्ज मंजूर केला तर प्रतिवादी मारुतीचेच नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वादींचे हक्कात प्रथम दर्शनी केस दिसून येत नाही. सबब त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ३ नकारार्थी उत्तरीत पारीत करत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करीता</u> :**

१४. मुद्दा क्र. १ ते ३ नकारार्थी उत्तरीत पारीत केल्यामुळे हा अर्ज नामंजुर करण्यात येत आहे. सबब खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**:: <u>आ दे श</u> ::**

१. अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करावा.

ठिकाण : वाई. (व्ही. एन. गिरवलकर)
दिनांक : २४.०९.२०१९. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, वाई.